# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN - U91100MH1998SGC117247

✉ apamvmmm2021@gmail.com Website: www.udyog.mahaswayam.gov.in


जा.क्र. APM/ADM/ 45/2026-27 दिनांक.13.04.2026

**कृपया प्रसिध्दीसाठी :**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या सोयीसाठी कार्यपद्धती अधिक सुलभ व पारदर्शक करण्यात आलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत बँक मंजुरी स्तरावर "Reject for Incomplete Documents" अर्थात अपूर्ण कागदपत्रांमुळे Reject स्थितीत असलेली प्रकरणे लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या लॉगिनद्वारे पाहता येणार असून, त्यामधील अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता लाभार्थ्यांना स्वतः ऑनलाइन अपलोड करून करता येणार आहे. यामुळे लाभार्थ्यांना कार्यालयीन फेऱ्या मारण्याची आवश्यकता राहणार नाही. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे अद्ययावत केल्यानंतर संबंधित प्रकरण "Scrutiny" स्तरावर दिसेल. त्या ठिकाणी कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी महामंडळामार्फत पूर्ण झाल्यानंतर पात्र प्रकरणांसाठी "Submit" पर्याय उपलब्ध होईल. लाभार्थ्यांनी "Submit" केल्यानंतर संबंधित प्रकरण पुढील तपासणीकरिता मुख्यालयाकडे पाठविण्यात येईल व त्यावर महामंडळामार्फत नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

त्यानंतरच्या टप्प्यात, लाभार्थी व्याज परताव्यासाठी क्लेम सादर करत असताना कागदपत्रांमधील त्रुटींमुळे Hold स्थितीत असलेली प्रकरणे लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिनवर कारणांसहित दिसून येतील. अशा प्रकरणांचे त्वरित निराकरण करण्यासाठी लाभार्थ्यांनी संबंधित त्रुटींची पूर्तता जिल्हा समन्वयकांमार्फत करावी. सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे जिल्हा समन्वयकांकडून प्राथमिक तपासणी करण्यात येते व त्यानंतर विभागीय समन्वयकांमार्फत अशी प्रकरणे मुख्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतात. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी होल्डची कारणे लक्षात घेऊन १५ दिवसांच्या कालावधीत अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करून आपले प्रकरण नियमित करून घ्यावे. आवश्यक असल्यास जिल्हा समन्वयकांकडून मार्गदर्शन घ्यावे. भविष्यात क्लेम होल्ड बाबतची कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा लाभार्थ्याच्या लॉगीनला उपलब्ध करून देणे बाबतची कार्यवाही महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

त्रुटी नसलेल्या क्लेम प्रकरणांमध्ये, पूर्वीच्या कार्यपद्धतीनुसार व्याज परताव्याची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाल्यानंतरच पुढील उर्वरित क्लेम सादर करण्यास परवानगी होती. मात्र, सुधारित प्रणालीमध्ये लाभार्थ्यांचा क्लेम "Sent for CAFO" या स्तरावर पोहोचताच पुढील उर्वरित क्लेम सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी प्रतीक्षा न करता उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा.

योजनेअंतर्गत पात्रता प्रमाणपत्र, बँक मंजुरी व व्याज परताव्यासाठी पात्र असलेली प्रकरणे तपासणीअंती एकापेक्षा अधिक समान संपर्क क्रमांक, बँक तपशील किंवा सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये विसंगती/खाडाखोड आढळल्यामुळे "Block"

करण्यात आलेली आहेत. असा निर्णय नाशिक व अहिल्यानगर येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे एजंट मार्फत झालेला गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर खबरदारी म्हणून घेण्यात आलेला होता. त्याबाबत सद्यस्थितीत फौजदारी कार्यवाही सुरु आहे तरी यामुळे काही लाभार्थ्यांची गैरसोय होत असल्याने अशा लाभार्थ्यांनी संपर्क क्रमांक किंवा बँक तपशीलामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून, तसेच ज्या प्रकरणांमध्ये कागदपत्रांमध्ये विसंगती/खाडाखोड आहे त्यांनी मूळ कागदपत्रांसह संबंधित अर्ज जिल्हा समन्वयकांकडे सादर करावा. सदर अर्जाची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर अशा प्रकरणांवर महामंडळामार्फत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

सर्व लाभार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या लॉगिनवर जाऊन प्रकरण Hold किंवा Block होण्याची कारणे तपासून त्वरित आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. काही अडचण असल्यास संबंधित जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे. वेब प्रणालीवरील सर्व संपर्क यादी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी लाभार्थ्यांनी या उपलब्धीचा लाभ घ्यावा.

असेही आवाहन करण्यात येत आहे की, महामंडळ नियमानुसार योजना राबवित असून लाभार्थ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ महामंडळाच्या अधिकृत वेब प्रणालीद्वारेच अर्ज व प्रक्रिया पूर्ण करावी.

¬ अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

VIJAYSINGH SHANKARRAO DESHMUKH

Digitally signed by VIJAYSINGH SHANKARRAO DESHMUKH
Date: 2026.04.13 17:04:55 +05'30'

**( विजयसिंह देशमुख ) ( भा.प्र.से. )**
**व्यवस्थापकीय संचालक**
**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या.**
**मुंबई-०१.**